# विवाह अधिकारी आणि विवाह निबंधक कार्यालयातील कामकाज

# (FUNCTIONS IN MARRIAGE OFFICER & REGISTRAR OFFICE)

विशेष विवाह कायदा, 1954 अन्वये खालील कामे विवाह अधिका-यांकडून पार पाडली जातात.

1. इच्छुक वर वधूंचे विवाह संपन्न करुन विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे.

2. अगोदरच झालेल्या विवाहांची, विशेष विवाह कायदयाअंतर्गत नोंदणी करणे.

राज्यातील जिल्हा मुख्यालयातील दुय्यम निबंधक हे जिल्हयासाठी विशेष विवाह नोंदणीचे काम करतात मुंबई शहर, मुंबई उपनगर व पुणे या 3 जिल्हयांसाठी विशेष विवाह अधिका-यांची स्वतंत्र कार्यालये आहेत.

वैदीक पध्दतीने संपन्न झालेल्या विवाहांची नोंदणी महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी अधिनियम,1998 नुसार, करण्याचे काम पूर्वी या विभागातील दुय्यम निंबधकांकडून केले जात होते. तथापि, आता हे काम संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेमधील नियुक्त करण्यात आलेल्या विवाह निबंधकाकडून केले जाते.